सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.४०५ ठ. क्र.३९४
दि. १९/१/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



एन.टी.पी.सी.द्वारा सोलापूर शहराकरिता व प्रकल्पग्रस्त गावाकरिता राबविण्यात येणारी पाणी पूरवठा योजना बाबत प्रस्तावात सविस्तर माहिती असून, मा.आयुक्त यांनी म.जी.प्रा.स.ने केलेल्या सुचनेप्रमाणे म.जी.प्रा.नी सुधारीत अंदाजपत्रक सो.म.पा.स सादर केले असून, सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु. २८९ कोटी इतकी असून मूळ अंदाजपत्रक व सुधारीत अंदाजपत्रक यातील एकूण फरक र.रु. ३९ कोटी इतकी असून यापैकी सोलापूर महानगरपालिकांनी र.रु. १५ कोटीचा निधी सोसायचा असून, उर्वरीत र.रु. २४ कोटीचा वाढीव निधीची मागणी एनटीपीसी कडे सादर करावयाची आहे. व वाढीव निधी एनटीपीसी अथवा मा.शासनाच्या इतर फंडातून मिळणेबाबत प्रयत्न करणेचे मा.खासदार यांनी आश्वासन दिले आहे. त्यामुळे सदरची योजना रद्द करुन एनटीपीसीनी र.रु. २५० कोटी सो.म.पा.कडे वर्ग करुन २०५१ सालच्या लोकसंख्येनुसार तयार केलेल्या आराखडयाप्रमाणे र.रु.१२४० कोटीची सुधारीत पाणीपुरवठा योजना सो.म.पा.ने राबविण्याचे ठरले. प्रस्तावात नमूद सर्व बाबी मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव मान्यतेस्तव सादर करणेकामी मा.आयुक्त यांचे दि.१३/१/२०१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली व टिपणीप्रमाणे कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच ही संपूर्ण योजना म.न.पा.मार्फत राबवावी व या योजनेचे काम द्रुत गतीने होण्याच्या दृष्टीने योजने अंतर्गत स्वतंत्र भागवाईज निविदा काढणेस व योजनेबाबतच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही व पत्रव्यवहार करणेस मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. सर्वसाधारण सभेकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

O/C

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज तात-१/४२३ ठ. क्र. ३९५
दि. २०/१/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.

तात-१/४२३

मा.स्थायी समिती ठ.क्र. ५७७ दि. २१-३-२०१३ अन्वये शहरातील महानगरपालिकेचे शॉपिंग सेंटर मधील गाळयांचे सन २००९-१० चे रेडिरेकनर प्रमाणे भाडे वाढलेले आहे त्या भाडयामध्ये २५ टक्के सूट देऊन या भाडेवाढीची अंमलबजावणी दि. १/४/२०१२ पासून करण्यांत यावी. त्या गाळेधारकांची मुदत ज्या दिवशी संपली त्या दिवसापासून ९ वर्षे करीता मुदतवाढ देण्यांत यावी. ज्या गाळेधारकांची ९ वर्षापेक्षा जास्त मुदत झाली असेल तर २०१४ पर्यंत धरुन त्यांना पुढील मुदतवाढ देण्यांत यावी.

रेडिरेकनर प्रमाणे होणा-या ट्रान्सफर फी मध्ये २५ टक्के सुट देण्यांत यावी.

या गाळा भाडयामध्ये दरवर्षाला ५ टक्के इतकी वाढ करण्यांत यावी. त्यांची मुदत ज्या वेळी संपली त्यांना त्याच वर्षाच्या रेडिरेकनरचे भाडे त्या तारखेपासून आकारण्यांत यावे. असा ठराव पारित झालेला असून, ठरावातील मजकुर " सन २००९-१० चे रेडीरेकनरप्रमाणे भाडे वाढलेले आहे त्या भाडयामध्ये २५ टक्के सुट देऊन या भाडयाची अंमलबजावणी ०१/४/२०१२ पासून करण्यात यावी " ठरावातील इथपर्यंतच्या मजकुर वगळण्यात येऊन ठरावातील उर्वरित मजकूराप्रमाणे कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच मा. आयुक्त यांनी शहरातील गाळे धारकाबाबत लिलाव करणेकरता जी बेकायदेशीर निविदाप्रक्रिया अवलंबलेली आहे ती रद्द करुन संबधित गाळेधारकांना २०१५ अखेर मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मा. महापौर यांनी म.न.पा.तील मा. पदाधिकारी, विद्यमान मा. माजी महापौर व सर्व गटनेते आणि गाळेधारकांचे प्रतिनिधी व मा. आयुक्त यांच्या समवेत बैठक आयोजित करुन योग्य तो तोडगा काढण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका